**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

# प्रेसनोट दिनांक – २०/०३/२०२४

**दि. १९/०३/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ३२३/२०२४ भा.द.वि. कलम ३०२ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १९/०३/२०२४ रोजी पहाटे ०४/०० वा. ते ०४/४५ वा. दरम्यान म्हेत्रे यांच्या दुस-या मजल्यावरील रुम, गुरुनानक नगर लेन नं. ०४, किलबील स्कुलजवळ, थेरगांव, पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि. १९/०३/२०२४ रोजी १९.२२ वा. |
| फिर्यादी | :- | सत्यनारायण व्यंकटेश पिल्लामारी, वय ३८ वर्षे, धंदा पोलिस शिपाई २१३४, नेमणुक वाकड पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड. ७०२०१२७०२६ |
| आरोपी | :- | भाऊसाहेब भानुदास बेदरे, वय ४२ वर्षे, रा. नरेश सायन्ना म्हेत्रे यांची रुम, गुरुनानक नगर क्रमांक ४, किलबील स्कुल जवळ, थेरगांव मुळ रा. मु.पो. बेदरवाडी ता. पाटोदा जि. बिड. **आरोपी मयत आहे** |
| तपशिल | :- | नमुद ता.वेळी व ठिकाणी (मयत) आरोपी याने त्याची मुलगी वय ७ वर्षे हिचा गळा आवळुन खुन करुन स्वतः गळफास घेवुन आत्महत्या केली आहे |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि नलावडे ९५५२५२०१९३ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण १९२/२०२४ भा.दं.वि कलम ३०७,५०४, ५०६,३४ भा.ह.का ३(२५),म.पो.अ.३७(१)(३) सह १३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१८/०३/२०२४ रोजी २२/३० वा चे सुमारास रासे फाटा मराठा हॉटेल ता.खेड जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१९/०३/२०२४ रोजी ०३.४५ वा |
| फिर्यादी | :- | स्वप्निल संजय शिंदे वय ३२ वर्षे धंदा हॉटेल राहणार रासे गावठाण तालुका खेड जिल्हा पुणे |
| आरोपी | :- | १)अजय अरुण गायकवाड वय २४ वर्षे रा भोसले वस्ती महाळुंगे इंगळे ता खेड जि पुणे<br>२) राहूल पवार ३) एक अज्ञात इसम पत्ता माहीत नाही<br>**आरोपी १ अटक आहे** |
| तपशिल | :- | फिर्यादी व आरोपी क्र १ यांचे मध्ये जुने वाद असुन नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी त्यांचे हॉटेलमध्ये असता एका ग्राहकाला काउंटरच्या जवळ मुख्य दरवाजाकडे पाठ करुन जेवणाचे बील घेवून उरलेले पैसे परत देत होते त्यावेळी अचानक फिर्यादीचे पाठीमागून फटाके फुटल्याचा फिर्यादीला आवाज आला. म्हणून पाठीमागे वळून पाहिले असता नमुद आरोपी हे असुन आरोपी क्र १ व ३ यांचे हातामध्ये पिस्टल होते. त्या दोघांनाही फिर्यादी यांना धक्का दिला. त्यावेळी हॉटेलच्या दरवाजाजवळ असणारा आरोपी क्र २ हा आतमध्ये धावत आला आणि फिर्यादीचा जिव घेण्याच्या इराद्याने त्याच्या हातामध्ये असणा-या पिस्टलने फिर्यादीवर एक गोळी फायर केली. ती फिर्यादीचे डोक्याला वरच्या बाजूस चाटून गेली. फिर्यादी हे जीव वाचविण्यासाठी हॉटेलच्या मुख्य दरवाजातून बाहेर पळत सुटले त्यावेळेस नमुद आरोपी हे मादरचोद, तूला आता सोडत नाही. तूला मारुन टाकणार असे बोलत फिर्यादीचे पाठीमागे धावू लागले. म्हणुन फिर्यादीने जीव वाचवत हॉटेलच्या डावीकडे वळून हरी डावरे यांच्या घरामध्ये धावत गेले आणि दरवाजाला आतून कडी लावली नमुद आरोपी सदर ठिकाणी आले व दरवाजावर शिव्या देत लाथा मारल्या फिर्यादीने दरवाजा उघडला नाही घराज्याबाहेर गर्दी जमल्यामुळे आरोपी हे पळुन गेले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि तलवाडे ९६५७२३०९६६ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | शिरगाव परंदवडी ९८/२०२४ भादवी कलम ३०७, ३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १९/०३/२०२४ रोजी सायं. ५.३० वा. पवना नगर ते बेबडओहळ जाणारे रोड वरील मानेग्रो कंपनीपासुन सुमारे २०० मीटर अंतरावर बेबडओहळ ता. मावळ जि. पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१९/०३/२०२४ रोजी २३.२७ वा |
| फिर्यादी | :- | श्री किरण मानसिंग भोसले वय ४७ वर्षे धंदा नोकरी रा. फलॅट नं. ५०२, सी-१ बिल्डींग, एक्झार्बीया, बेबडओहळ ता. मावळ जि. पुणे. मुळ रा. निकमवाडी, पो. जांब ता. वाई जि. सातारा. मो. नं. ७०३०३९०५६३ |
| आरोपी | :- | १) कुमार ओझरकर वय अंदाजे २५ वर्षे , रा. शिवणे ता. मावळ जि. पुणे<br>२) एक अनोळखी साथीदार नाव पत्ता माहित नाही<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे कंपनीचे मॅनेजर सुधिर मच्छिंद्र अडसुळ वय ४७ वर्षे हे कामावरुन सुटल्यानंतर त्यांचे पॅशन प्रो मो सा नं एमएच १२ बीटी ३२१३ वरुन पवनानगर ते बेबडओव्हळ रोडने घरी जात असताना त्यांच्याच कॅनिंग विभागात काम करणारे आरोपी क्र १ व त्याचा अनोळखी साथिदार यांनी कंपनी मॅनेजर हे त्यांना कंपनीमधील कामे सांगायचे या काणावरुन त्यांचेत धुसफुस होवुन एका मोटार सायकल वरून पाठीमागुन जाउन त्यांच्या हातातील स्टीलच्या पाईपने सुधिर अडसुळ यांच्या डोक्यात व शरीरावर ठिकठिकाणी जोरजोरात मारहाण करून त्यांच्या डोक्याची कवटी फ्रॅक्चर करून सुधिर अडसुळ यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि लोहेकर ८२०८५१६४४८ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ३३०/२०२४ भादवि. कलम ३०४(अ), ३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२३/१२/२३ रोजी दुपारी ०१/४० वा सुमारास निसर्ग बेलीरोझ सोसायटी, गोल्डन केअर हॉस्पिटल जवळ, वाकड पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | *दि.१९/०३/२०२४ रोजी २१.१९ वा* |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | १) गुंडू कसनु पवार, वय- ४० वर्ष, रा-सिध्दी निसर्ग असोशिएट, कस्तूरी रेस्टॉरंटसमोर, भुमकर वस्ती, हिंजवडी, पुणे<br>२) अभिषेक अभय देवने, वय- २६ वर्ष, रा- फलॅट नं.०७, आदित्य अपार्टमेंट, वाकड,<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे पती नामे आशिष जव्हेरी वय ४३ वर्षे हे कसटमरला निसर्ग बेलीरोझ सोसायटी, गोल्डन केअर हॉस्पिटल जवळ, वाकड पुणे येथे फलॅट दाखवण्याकरीता गेलेले असताना आरोपी क्र १ व २ यांनी तेथे सुरक्षेच्या उपाययोजना केल्या नाहीत तर, त्यामध्ये पडुन जीव जाऊ शकतो याबाबत निष्काळजीपणा करून त्याठिकाणी काम चालु असताना कोणत्याही कामगारांच्या तसेच व्हिझीटर लोकांच्या सुरक्षेच्या उपाययोजाना न केल्यामुळे आरोपींचे निष्काळजीपणामुळे फिर्यादीचे पती हे ०६ माळयावरील लिफट डक्ट मध्ये पडुन त्यांच्या मृत्युस कारणीभुत झाले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि शेळके ९३७१४१९९९९ |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ३२१/२०२४ भादवि. कलम ३०६ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १९/०३/२०२४ रोजी पहाटे ०४/०० वा. ते ०४/४५ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या राहते घरी नरेश सायन्ना म्हेत्रे यांची रुम, गुरुनानक नगर क्रमांक ४, किलबील स्कुल जवळ, थेरगांव, पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि. १९/०३/२०२४ रोजी १७/१३ वा. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |

आरोपी :- सुनिल कुवटे ऊर्फ रामराव कुयटे ९०९६६७७८११

**आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने फिर्यादी यांचे पती भाऊसाहेब भानुदास बेदरे, वय ४२ वर्षे, यांना जागा विक्री केल्याचे पैसे न देवुन फसवणुक केलेचे कारणावरुन फिर्यादी यांचे पती यांनी राहते घरी मुलगी हिच्या गळयाला दोरी आवळुन तिला मारुन स्वतः दोरीच्या सहाय्याने पंख्याला गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि पवार ९८२३५४१०७६

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- भोसरी एमआयडीसी १३९/२०२४ भादंवि कलम ३०४ (अ), २७९,मो.वाहन का क १८४ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. १९/०३/२०२४ रोजी ०५/१५ वा. चे सु एम.आय.डि.सी. चौक, भोसरी येथुन लांडेवाडी भोसरी कडे जात असतांना, कामगार नेते रुपमय चटर्जी पुतळ्या जवळ, रोडवर

गुन्हा दाखल :- दि.१९/०३/२०२४ रोजी २३.३५ वा

फिर्यादी :- ताजऊद्दीन निजामऊद्दीन अन्सारी वय ४६ वर्ष, धंदा चालक, रा.विकास कॉलनी नं. लांडेवाडी, भोसरी,पुणे

आरोपी :- सोमश्वर काशिनाथ शिंदे वय-२३ वर्षे, रा.चक्रपाणी वसाहत, गल्ली नं.२, महादेव नगर, भोसरी, पुणे मुळ गाव- मु.पो. मिरवट, ता.परळी, जि. बिड

**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचा भाउ बद्रुद्दिन निजामऊद्दीन अन्सारी वय ४९ वर्ष हा त्याच्या हिरो होंडा स्पेलंडर मोटार सायकल नं.एम.एच.१४ बी.यु.०२६८ हिचे वरुन एम.आय.डि.सी.चौक,भोसरी येथुन लांडेवाडी भोसरी कडे जात असतांना, कामगार नेते रुपमय चटर्जी पुतळ्या जवळ, रोडवर पी.एम.टी.बस क्रमांक एम.एच.१४ एच.यु.६२९० वरील चालक आरोपी याने त्याच्या ताब्यातील वाहन हयगयीने, बेदरकारपणे, वेगाने चालवुन माझा भाऊ बद्रुद्दिन निजामऊद्दीन अन्सारी याचे दुचाकीस पाठीमागुन पी.एम.टी.बसच्या उजव्या बाजुने धडक देवून डोक्याला गंभीर दुखापत केली व त्याचे मृत्यूस कारणीभुत झाला आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि इंगळे ९६६५४०३३७७

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- महाळुंगे एमआयडीसी १५३/२०२४ भादवि कलम ४०६ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि १२/०३/२०२४ रोजी ११:२५ वा तेदिनांकदिनांक १४/०३/२०२४ रोजी१५:०२ वा चेदरम्यान बेंगलोर ते मौजे आंबेठाण ता खेड जि पुणे असे प्रवास दरम्यान

गुन्हा दाखल :- दि १९/०३/२०२४ रोजी २०.५९ वा

फिर्यादी :- अनुज सचिव तिवारी, वय २५ वर्ष रा. सुखवाणी पालम्स गेट, अजमेरा एक्साटीक समोर, वाघोली पुणे, मुळ. खरहारा तिवारी, पोस्ट नकटी मिस्रोली, जि मिर्झापुर उत्तरप्रदेश ९३०५१४९८६३

आरोपी :- शाहिद इलियास, वय २५ वर्ष, राहणार-भुकनाकीढानी, गुवाल्दा, तहसिल तिजारा, जिल्हा अल्वर, राजस्थान ९६६४२७००४२, ९९८२४१२४८९

**अटक नाही**

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी हा फिर्यादी याचे सेंच्युरी कार्गो कॅरियर प्रा.लि. या ट्रान्सपोर्ट फर्म मध्ये कंटेनर नंबर एन.एल ०१/ए.एफ/७७८२ यावर चालक म्हणुन नोकरी करीत होता. फिर्याद यांनी आरोपी यास त्याचे ताब्यातील कंटेनर मधुन अमेझॉन कंपनीचा माल घेवुन येण्याची जबाबदारी विश्वासाने सोपविण्यात आली होती. त्यानुसार अमेझॉन कंपनीचे बेंगलोर येथील गोडावुन मधुन १,५३,९६,३००/रु किंमतीचे वेगवेगळया कंपनीचे मोबाईल फोन, लॅपटॉप, इलेक्ट्रीक वस्तु, ब्ल्यु टुथ्, कपडे व इतरचिजवस्तुअसा माल विश्वासाने आरोपीचे ताब्यातील कंटेनरमध्ये भरण्यात आला. सदरचा माल भरलेला कंटेनर घेवुन बेंगलोर ते आंबेठाण, पुणे असे आरोपी हा घेवुन येत असताना त्याने प्रवास दरम्यान त्याचेकडे सोपविलेले मालापैकी ४८,६९,९५६/ रु किंमतीचे वेगवेगळया कंपनीचे मोबाईल फोन, लॅपटॉप, इलेक्ट्रीक वस्तु, ब्ल्यु टुथ्, कपडे, असे विविध चिजवस्तु फिर्यादीचे ट्रान्सपोर्ट फर्मचा विश्वासघातकरुन स्वतःचे आर्थिक फायदया करीता काढुन घेवुन अपहार करुन स्वतःचा मोबाईल फोन बंद करुन परागंदा झालेला आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि घाडगे ८६५२५२३९७२

०८.

पोस्टे व गु रजि.नं. :- भोसरी एमआयडीसी १३८/२०२४ भादंवि.कलम ४२०,३४ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ०१/०७/२०२३ रोजी दुपारी २/०० ते सायंकाळी ७/३० वा दरम्यान यु.पी. आय. ॲपद्वारे व नेट बँकीगद्वारे डि.६०३, श्री गणेश टॉवर्स, साईनाथ हॉ.जवळ, स्पाईन रोड, मोशी पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि १९/०३/२०२४ रोजी २२.५१ वा

फिर्यादी :- फिर्यादी

आरोपी :- १) मोबाईल नंबर ८९८८५२१०८२ धारक मुलगी नामे अंजली नाव,पत्ता महित नाही व
२) टेलीग्रामआय.डी.नं. @Neha_Goddess,
३) टेलीग्राम आय.डी.नं. @Das_lucky03 धारक नाव,पत्ता महित नाही
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील अज्ञात आरोपी क्र १ ते ३ यांनी फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन, टेलिग्राम वरुन pms.com वेबसाईड वरील टास्क पुर्ण केले करुन घेतले. नंतर जास्त परतावा मिळेल असे असे प्रलोभन दाखवुन फिर्यादी यांचे सी.टि..बँक शाखा कोरगाव पार्क खाते ॲक्सीस बँक शाखा, इंद्रायणीनगर, भोसरी पुणे खाते वर ट्रान्झेक्शन, करुन फिर्यादीकडुन वेगवेगळ्या खाते क्रमांकवर आतापर्यंत २,०३,७००/- रुपये एवढी रक्कम यु.पी.आय. ॲपद्वारे व नेट बँकीगद्वारे घेवुन, फिर्यादी यांची मुळ रक्कम तसेच त्यावरील परतावा न देता फिर्यादीची फसवणुक केली आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि खताळ ७८७५२०९२३७